स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
विद्याविकास
स्वरंग

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**विद्यार्थी विकास मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. संतोष परचुरे**
**संचालक**

संदर्भ क्र. विविमं/२०२२–२३/५६८ दिनांक : २७/०४/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय** : विद्यापीठ कार्यक्षेत्रातील मान्यताप्राप्त शिक्षकांमधून विभाग/जिल्हा स्तर समन्वयक म्हणून अनुभवी व इच्छुक विद्यार्थी कल्याण अधिकारी यांचे नामांकन.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार विद्यापीठामध्ये जी प्राधिकरणे अस्तित्वात आली आहेत त्यापैकी कलम २६ नुसार विद्यार्थी विकास मंडळ हे एक प्राधिकरण आहे. विद्यार्थी विकास मंडळ या प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये नव्या कायद्यात ५६ (१) नुसार नमूद केली आहेत. विद्यार्थी विकास मंडळाद्वारे महाविद्यालये, परिसंस्था व विद्यापीठ विभागांमधील विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक व कल्याणकारी कार्यक्रमांची आखणी आणि त्यांचे अन्वेक्षण करून विद्यार्थ्यांच्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या बाबतीत प्रादेशिक व राष्ट्रीय मंडळांशी दुवा साधणे, तसेच कमवा व शिका योजना, शैक्षणिक कर्ज, कुलगुरू साहाय्य निधी, विद्यार्थी आदान–प्रदान योजना यासारख्या विद्यार्थी विकासाच्या योजना तयार करणे, विद्यापीठस्तरीय स्पर्धा, कौशल्य विकास कार्यशाळा याबरोबरच प्रायोगिक कला व ललित कला क्षेत्राचे आकलन होण्यासाठी उपक्रम राबविणे, विद्यार्थ्यांच्या विद्यार्थी जीवनातील तक्रारी दूर करणे व विद्यार्थ्यांसाठी लैंगिक छळ व रॅगिंग प्रतिबंध यंत्रणा उभारणे या आणि अशा प्रकारच्या विद्यार्थी विकासाच्या रचनात्मक योजना व उपाययोजना राबवण्याबाबत निर्देशित केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित पुणे, अहमदनगर व नाशिक अशा तीन जिल्हयांच्या कार्यक्षेत्रात ग्रामीण–शहर–महापालिका क्षेत्र/तालुका/विभाग/जिल्हा यास्तरावर कामकाजाच्यादृष्टीने समन्वयक पदाची जबाबदारी देऊन कामकाज सोपविणेबाबत नामांकन करण्यात येणार आहे. सदर जबाबदारीच्यादृष्टीने इच्छुक व पात्र विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांमधून; विद्यार्थी कल्याण अधिकारी कामकाज, सांस्कृतिक–सहशैक्षणिक–उपशैक्षणिक–विस्तार कार्यक्रम, कल्याणकारी योजना व उपक्रम तसेच इतर पूरक कामकाजाचा अनुभव विशेषत्वाने विचारात घेऊन नामांकन करणे प्रस्तावित आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेत पूर्व अथवा सद्यस्थितित कार्यरत विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून किमान ३ वर्षांचा अनुभवधारक व या समन्वयक पदाकरिता इच्छुक व पात्र शिक्षकांस (**www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement–समन्वयक नामांकन प्रस्ताव**) **येथे शनिवार दिनांक १३ मे, २०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने नामित करावे. ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या प्रस्तावाची प्रिंट काढून त्यावर नामित व्यक्तींची स्वेच्छा स्वाक्षरी व मा. प्राचार्य/संचालक म्हणून आपले स्पष्ट अभिप्राय/शिफारस असलेला प्रस्ताव विहित ठिकाणी अपलोड (Upload) करावा. आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रस्ताव या विभागाकडे शुक्रवार, दिनांक १९ मे, २०२३ पर्यंत एका प्रतीत प्रत्यक्ष जमा करावेत**. सदर प्रस्तावांची मूळ प्रत या कार्यालयात जमा करणे अनिवार्य असून त्यानुसार विद्यार्थी विकास मंडळाकडे प्रत्यक्ष प्राप्त होणारे प्रस्तावच पुढील प्रक्रियेकरिता विचाराधीन असतील.

आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील संबधितांना याबाबत अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक, विद्यार्थी विकास मंडळ

ऑनलाईनबाबत अधिक माहिती व संपर्कासाठी : (०२०–७१५३३६३३)
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in
विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयीन अधिक माहितीसाठी : ०२०–२५६२२६८०